महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी
योजनेअंतर्गत कार्यान्वित यंत्रणेमार्फत विखुरलेल्या
स्वरुपात उंच रोपांची लागवड करणेबाबत.
तांत्रिक व आर्थिक मापदंड,मार्गदर्शक सूचना देणेबाबत

# महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्र. मग्रारो-२०११/प्र.क्र २८/रोहयो-१
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १ जून,२०११.

**वाचा :** १) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५
२) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.रोहयो -२००५/प्र.क्र.१९४/रोहयो-१० दिनांक २३ डिसेंबर, २००५
३) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम (सुधारित) कायदा, २००६
४) शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१०/प्र.क्र.३५/रोहयो-१ दि. ९ डिसेंबर, २०१०
५) शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१०/प्र.क्र.११४/रोहयो-१दि. २२ फेब्रुवारी,२०११
६) शासनपत्र क्र मग्रारो-२०११/प्र.क्र.१०/रोहयो-१ दि. १४ फेब्रुवारी, २०११
७) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. मजुरी-२०११/प्र.१५/मग्रारो-१, दि.१९/३/२०११
८) शासन निर्णय क्र.मग्रारो-२०११/प्र.क्र.२८/रोहयो-१ दिनांक ९ मे, २०११

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम, २००५ अंतर्गत राज्यामध्ये मग्रारोहयो टप्प्याटप्प्याने सुरु करण्यात आली असून दिनांक १ एप्रिल, २००८ पासून संपूर्ण राज्यामध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यानुसार संदर्भीय क्र. २ मधील शासन निर्णय दिनांक २३ डिसेंबर, २००५ मधील अनुज्ञेय कामात रोपवाटिका व वृक्ष लागवड इत्यादींचा समावेश आहे. संदर्भीय क्र.१मधील केंद्र शासनाच्या कायद्यातील शेड्यूल -१ मध्ये अनुज्ञेय कामात वनीकरण व झाडे लावणे (Afforestation and tree planting) यांना प्राधान्यक्रम दिलेली आहे.

वैश्विक तापमानवाढ आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी, ग्रामीण भागांना हरीत करणे तसेच ग्रामीण भागातील नागरिकांची, लोकांची लाकूडफाटा, इंधन, फळांची, औषधी वनस्पती व गुरांच्या चाऱ्यांची गरज भागविण्यासाठी व ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी रोपवाटीका तयार करणे व वृक्ष लागवड करणे ही अत्यंत प्रभावी उपाययोजना आहे.

ग्रामविकास विभागाने सर्व जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत यांनी महाराष्ट्र हरित करण्यासाठी मोठया प्रमाणात झाडे लावण्याचा कार्यक्रम राबविण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने संचालक, सामाजिक वनीकरण, म.रा. पुणे यांनी विखुरलेल्या स्वरुपात स्वतंत्र झाडांची लागवड करण्यासाठी तांत्रिक व आर्थिक मापदंड निश्चित करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्या अनुषंगाने शासनाने संदर्भाधीन दिनांक ९ मे, २०११ च्या शासन निर्णयान्वये विखुरलेल्या स्वरुपात उंच रोपांची लागवड करण्याबाबत सुधारीत तांत्रिक व आर्थिक मापदंडास मान्यता दिलेली आहे. त्याच धर्तीवर कृषि विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग, व वन विभाग इत्यादी कार्यान्वित यंत्रणांनी ग्रामपंचायतीच्या हद्दीत वृक्ष लागवडीची योजना राबविण्यासाठी आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना व आर्थिक व तांत्रिक मापदंड ठरवून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन आता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.:-

शासन निर्णय :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फक्त ग्रामीण भागात वनीकरण करण्यासाठी शासकिय इमारत, आश्रम शाळा, शासकिय इमारतींचा परिसर, इतर शाळेचे प्रांगण, मंदिर परिसर, बाजार परिसर, कार्यालयाजवळ, विहिरीचे जवळ, विखुरलेल्या स्वरुपात उंच रोपांची लागवड याबाबींच्या तांत्रिक व आर्थिक मापदंडास शासन पुढीलप्रमाणे मान्यता देत आहे.:-

सविस्तर दरपत्रकाचे **परिशिष्ट-अ** सोबत जोडण्यात आले आहे.

| मुद्दा | रोपांची संख्या | आर्थिक मापदंड | | तांत्रिक मापदंड |
|---|---|---|---|---|
| | | प्रति घटक **खर्च रुपये** | प्रति रोप **खर्च** रुपये | |
| महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत आश्रम शाळा, शासकिय इमारतींचा परिसर, गावठाण, इतर शाळेचे प्रांगण, मंदिर परिसर, बाजार परिसर, कार्यालयाजवळ, विहिरीचे जवळ, स्मशानभूमी परिसर,व ग्रामपंचायत हद्दीतील इतर उपलब्ध जागा इत्यादी ठिकाणी विखुरलेल्या स्वरुपात उंच रोपांची लागवड. | १०० | ३५,६४६/- | ३५६/- | खड्डयांचा आकार ६०x६०x६० सें.मी. दोन रोपांतील अंतर कमीत कमी ४ मीटर असावे. तसेच १८ महिने वयोमानाची उंच, सदृढ, दर्जेदार व निवडक रोपांची लागवड करावी. |

२. या कार्यक्रमांसाठी पुढील उपाययोजना करण्यात याव्यात:-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमार्फत रोपवाटीका व वृक्ष लागवड, त्याची जोपासना, देखभाल व संरक्षण करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणांवर राहील.

(२) सदर आर्थिक मापदंड रुपये १२७/- मजुरीच्या दराच्या आधारे निश्चित केले आहेत. तथापि, मजुरांना मजुरी प्रत्यक्ष कामाच्या मोजमाप प्रमाणेच देण्यात यावी.

(३) हे कार्यक्रम महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामासाठी निश्चित करण्यात आलेली तरतूद व मापदंडानुसार राबविणे बंधनकारक राहील.

उदा. अ) कार्यक्रमाबद्दल ग्रामसभांनी आवश्यक ठराव करुन,कार्यक्रम अंतर्गत कामांना वार्षिक नियोजन आराखडयात समाविष्ट करावे.

ब) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम (सुधारणा २००६) व केंद्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार मजुरांना जॉबकार्ड ठेवणे बंधनकारक राहील. त्यावर तसेच संबंधित कागदपत्रावर मजुरांच्या कामाची नोंद ठेवणे तसेच त्यानुषंगाने इतर आवश्यक रेकॉर्ड तसेच नोंदवहया ठेवणे बंधनकारक राहील.

क) मजुरांना त्यांच्या कामाची मजुरी १५ दिवसात अदा करणे नियमाने बंधनकारक राहील.

ड) कंत्राटद्वारे कामास बंदी राहील.

इ) पारदर्शकता, सामाजिक अंकेक्षण इत्यादी नियमानुसार आवश्यक राहील.

३. सदर वनीकरण हे गावाच्या आश्रम शाळा, शासकिय इमारतींचा परिसर, इतर शाळेचे प्रांगण, मंदिर परिसर, बाजार परिसर, कार्यालयाजवळ, विहिरीचे जवळ, यांच्या जमीनीवर करता येईल. खाजगी जमिनीवर करण्यात येऊ नये. वनीकरणाद्वारे तयार होणा-या मालमत्तेवर संबंधित यंत्रणांचा अधिकार राहील तसेच त्याची नोंद मग्रारोहयोच्या कामाच्या मालमत्ता नोंदवहीत घेण्यात यावी.

४. कार्यान्वित यंत्रणेने दर्जेदार, उंच व सुदृढ निवडक रोपे सामाजिक वनीकरणाच्या रोपवाटिकेतून किंवा ज्या रोपवाटिकेच्या रोपांचे (किसान रोपवाटिका) दर शासनाने मंजूर केलेले आहेत अशा रोपवाटिकेतून खरेदी करावेत.

५. कार्यान्वित यंत्रणांनी वनीकरण कार्यक्रमाचा खर्च पुढील दोन भागांवर करण्यात यावा.:-

अ) **<u>मजुरांच्या मजुरीवरील खर्च -</u>**

मजुरांची मजुरी हजेरीपटाच्या आधारे व प्रत्यक्ष केलेल्या कामानुसार अदा करण्यात यावी. मजुरांना मजुरी अदा केलेले स्वाक्षरीत हजेरीपत्रक योग्य प्रकारे जतन करुन ठेवावे. मजुरांची मजुरी एकुण अंदाजपत्रकीय रकमेच्या कमीत कमी ६०% असावी.

ब) **<u>साधनसामुग्रीवरील खर्च -</u>**

मजुराच्या मजुरी व्यतिरिक्त वनीकरण कार्यक्रमासाठी करण्यातआलेला इतर सर्व खर्च साधन सामुग्रीवरील खर्च म्हणून धरण्यात यावा. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत खरेदी केलेल्या सर्व साहित्यावरील खर्च उदा. पॉलिथीन बॅग, खत, रोपवाटिकेच्या जागेचे भाडे, कुशल, अर्धकुशल मजुरांची मजुरी, सामुग्रीची ने-आण इत्यादी बाबींवर करण्यात आलेला खर्च सामुग्रीचा खर्च म्हणून समजावा, सदर खर्च संपूर्ण कार्यक्रम खर्चाच्या४०%पेक्षा जास्त नसावा.

६. कार्यान्वित यंत्रणा खालील वनीकरणाचा कार्यक्रम राबवू शकते.
आश्रम शाळा, शासकिय इमारतींचा परिसर, इतर शाळेचे प्रांगण, मंदिर परिसर, बाजार परिसर, कार्यालयाजवळ, विहिरीचे जवळ, विखुरलेल्या स्वरुपात वृक्ष लागवड करु शकते.

७. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत आश्रम शाळा, शासकिय इमारतींचा परिसर, गावठाण, इतर शाळेचे प्रांगण, मंदिर परिसर, बाजार परिसर, कार्यालयाजवळ, विहिरींचे जवळ, स्मशानभूमी परिसर,व ग्रामपंचायत हद्दीतील इतर उपलब्ध जागा विखुरलेल्या स्वरुपात उंच रोपांच्या लागवडीची तांत्रिक व आर्थिक मापदंड या शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात येत आहेत.

८. **प्रशासकिय व तांत्रिक मान्यता**:- सदर कार्यक्रमांतर्गत **<u>प्रशासकीय मान्यता संबधित तहसिलदारांनी दयावी तसेच तांत्रिक मान्यता संबंधित कार्यान्वित यंत्रणेच्या सक्षम तांत्रिक अधिका-यांनी दयावी.</u>** या करिता संबंधित यंत्रणेच्या सक्षम तांत्रिक अधिका-यास योग्य ते प्रशिक्षण सामाजिक वनीकरण विभागाने द्यावे.

९. **<u>सामाजिक वनीकरण व ग्राम विकास विभागाची जबाबदारी/भूमिका -</u>**

अ) या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी रोपवाटिका व वनीकरणबाबतच्या तांत्रिक बाबी जसे अंदाजपत्रके तयार करणे, दर्जेदार रोपांची निवड करणे, रोप लागवड व नंतरचे संबंधित काम इत्यादी.याबाबतचे मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्याची जबाबदारी सामाजिक वनीकरण विभाग यांची राहील. त्याचप्रमाणे शासन सुचनेनुसार वेळोवेळी विशिष्ठ बाबीकरिता कामाचा दर्जा व गुणवत्तेबदल तपासणी करण्याचे अधिकार सामाजिक वनीकरण विभागाला राहतील. सामाजिक वनीकरण विभागाने या कार्यक्रमाचे तांत्रिक बाबींचे संदर्भात आवश्यक मार्गदर्शन पुस्तिकेद्वारे/ सीडीद्वारे/ व्हिडीओद्वारे प्रसिध्द करावे.

ब) कार्यान्वित यंत्रणा जिल्हाधिका-यांच्या अधिपत्याखाली येतात. यंत्रणेमार्फत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबविताना जिल्हाधिकारी यांची सर्वात महत्वाची भुमिका व जबाबदारी राहणार आहे. जिल्हाधिका-यांनी त्यांच्या अधिनस्त तहसिलदारांना हा कार्यक्रम राबविण्याबाबत आदेश / सूचना द्याव्यात व मार्गदर्शन करावे. कार्यक्रमांची अंमलबजावणी सर्व कार्यान्वित यंत्रणेमार्फत होणार असल्याने त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत यंत्रणेच्या जिल्हा प्रमुखांची राहील.

१०. वृक्ष लागवड संबंधित कामे ही शेती प्रमाणे विशिष्ठ मोसमात करणे आवश्यक आहे. दर्जेदार, उंच व सुदृढ निवडक रोपांची निवड करण्यात यावी. रोपांची वाढ चांगल्या प्रकारे होण्यासाठी रोपांची लागवड तसेच नंतरची कामे योग्यवेळी व योग्य पध्दतीने करुन त्याचे संरक्षण करणे आवश्यक आहे. जिल्हा कार्यक्रम अधिकारी (जिल्हाधिकारी), सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद), प्रोग्रॅम अधिकारी (तहसिलदार), सह प्रोग्रॅम अधिकारी (गट विकास अधिकारी) व उपसंचालक, सामाजिक वनीकरण यांनी हा महत्वाचा कार्यक्रम राज्यात चांगल्याप्रकारे राबविण्यासाठी आपले स्तरावर एकत्रितपणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०११०६०२११२६५६००१ हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(व्ही.गिरीराज)
प्रधान सचिव (रोहयो)

प्रति,

मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
सर्व अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त.
आयुक्त (कृषि),महाराष्ट्र राज्य, पुणे.
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे.
प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, भुजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
उप सचिव (रोहयो समिती), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी (बृहन्मुंबई वगळून)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद.
सर्व अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
महासंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई. (प्रसिध्दी करीता),
विभागीय कृषि सहसंचालक,ठाणे,पुणे,कोल्हापूर,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर, लातूर.
सर्व अधीक्षक कृषि अधिकारी,
सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते, नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक/पुणे/कोंकण वृत्त ठाणे.
सर्व मुख्य वन संरक्षक/सर्व उप वनसंरक्षक.
सर्व विभागीय वन संरक्षक/सर्व विभागीय मृदसंधारण अधिकारी.
सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व कार्यासन अधिकारी, रोहयो प्रभाग व जलसंधारण विभाग.
निवडनस्ती / सारग्रंथ रोहयो-१

परिशिष्ट - अ

बिखुरलेल्या स्वरुपात स्वतंत्र वृक्षलागवड - खड्डे - ०.६० X ०.६० X ०.६० मी. आकारमानाचे.
दोन रोपांतील अंतर कमीत कमी ४ मीटर असावे.
आश्रमशाळा, शासकीय इमारतींचा परिसर, इतर शाळेचे प्रांगण, मंदिर परिसर, बाजार परिसर, कार्यालयाजवळ, विहिरींचे जवळ, या ठिकाणी जास्तीत जास्त १०० रोपांची (१८ महिने वयोमानाची) लागवड करणे.

दैनंदिन मजुरीचा दर रु १२७/-

| अ.क्र. | तपशील | मनुष्य दिन | मजुरी | सामुग्री | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| अ | **लागवड पूर्व कामे** | | | | |
| १ | सर्वेक्षण व सिमांकन ०.०३ मदिन प्रति ५० खड्डे | ०.०६ | ७.६२ | ०.०० | ७.६२ |
| २ | खड्डे आखणी करणे १०० खड्डे - ०.१३ मदिन प्रति ५० खड्डेसापुरु प्रति ५० खड्डे | ०.२६ | ३३.०२ | ४.४८ | ३७.५० |
| ३ | खड्डे खोदणेआकार ०.६०X०.६०X०.६० मी एकूण खड्डे १००- ७.६८ मदिन प्रति ५० खड्डे | १५.३६ | १९५०.७२ | ०.०० | १९५०.७२ |
| | एकूण | १५.६८ | १९९१.३६ | ४.४८ | १९९५.८४ |
| | मजुर कल्याण खर्च २.७० % | | | | ५३.८९ |
| | आकस्मिक खर्च २ % | | | | ३९.९२ |
| | एकंदर एकूण | १५.६८ | १९९१.३६ | ४.४८ | २०८९.६४ |
| ब | **प्रथम वर्ष कामे** | | | | |
| ४ | ०.६० X ०.६० X०.६० मीआकाराचे १०० खड्डे सभोवतालच्या चांगल्या मातीने भरणे. भरतेवेळी खड्ड्यात सिंगल सुपर फॉस्फेट, लिंडेन बुरशीनाशके, किटकनाशके, कंपोस्ट / शेणखत प्रत्येक खड्ड्यात टाकणे २.५ म. दिन प्रमाणे प्रति ५० खड्ड्यांसाठी. | ५.०० | ६३५.०० | २००.०० | ८३५.०० |
| ५ | निवडक रोपे खरेदी करणे ११० उंच रोपे त्यापैकी ७०% रोपे शोभिवंत व सावली देणाऱ्या प्रजाती व ३० % रोपे फळझाडे तसेच निवडक व धार्मिक महत्व असलेले वृक्ष याप्रमाणे प्रति रोप रु.५०/- | ०.०० | ०.०० | ५५००.०० | ५५००.०० |
| ६ | रोपवाटिकेपासून रोपवन क्षेत्रापर्यंत ११० रोपांची भरणीवाहतुक व रोपे लागवडीच्या जागेवर ठिकठिकाणी उतरवून ठेवणे २ म. दि-। ५५ रोपांना व सा.प्र. रु. ३००/- प्रति ५५ रोपांसाठी | २.० | २५४.०० | ६००.०० | ८५४.०० |
| ७ | १०० रोपांची लागवड करणे २.०१ म. दिन ५० रोपांसाठी | ४.०२ | ५१०.५४ | ०.०० | ५१०.५४ |
| ८ | मरअळीच्या ठिकाणी १० टक्के (१० रोपे रोपांची खड्ड्यांमध्ये लागवड करणे ०.२० म.दिन प्रति ५ रोपांना.) | ०.४० | ५०.८० | ०.०० | ५०.८० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | रोपांसभोवती काटेरी फांद्यांचे कुंपण करणे व आवश्यकतेनुसार त्याची दुरुस्ती करणे १३.३९ मदिन ५० रोपांसाठी | २६.७८ | ३४०१.०६ | ७०३.०० | ४१०४.०६ |
| १० | १०० रोपांना निंदणी व माती सैल करुन आळे करणे (३ वेळा) आणि पाणी देण्यासाठी आळी करुन माती सैल करणे ३.४० म.दिन प्रति ५० खड्ड्यांसाठी व आवश्यकतेनुसार खते देणे. | ६.८० | ८६३.६० | ४५.०० | ९०८.६० |
| ११ | संरक्षण व देखभाल व संगोपन - | २४.२८ | ३०८३.५६ | ०.०० | ३०८३.५६ |
| १२ | गरजेनुसार १०० रोपांना प्रति रोप २० लिटर प्रमाणे ४ वेळा पाणी देणे ( ५० रोपांना ६ वेळा पाणी देणेसाठी ३.७ म.दि त्यात रु. ३८७.४० बैलगाडीभाडे, गाडीवान व बैलजोडी यांचेवर खर्च रोहयो बाब क्र २८ (शा. नि. दि. ०९/११/२००९) व १ मजूर पाणी देणेसाठी असे एकूण रु. ५१४.४० प्र.म.दिन ऑक्टोबर, जानेवारी, फेब्रुवारी, मार्च | ४.९४ | २५४१.१४ | ०.०० | २५४१.१४ |
| | एकूण | ७४.२२ | ११३३९.७० | ७०४८.०० | १८३८७.७०<br>० |
| | मजुर कल्याण खर्च २.७० % | | | | ४९६.४७ |
| | आकस्मिक खर्च २ % | | | | ३६७.७५ |
| | एकंदर एकूण | ७४.२२ | ११३३९.७० | ७०४८.०० | १९२५१.९२ |
| क | **द्वितीय वर्ष कामे** | | | | |
| १३ | १०० रोपांना निंदणी व माती सैल करुन आळे करणे. (३ वेळा )आणि पाणी देण्यासाठी आळी करुन माती सैल करणे ३.४०मदिन प्रति ५० खड्ड्यांसाठी व आवश्यकतेनुसार खते देणे | ६.८० | ८६३.६० | ४५.०० | ९०८.६० |
| १४ | संरक्षण व देखभाल व संगोपन -<br>द्वितीय. वर्ष - एप्रिल ते मार्च | २९.४२ | ३७३६.३४ | ०.०० | ३७३६.३४ |
| १५ | गरजेनुसार १०० रोपांना प्रति रोप २० लिटर प्रमाणे ५ वेळा पाणी देणे ( ५० रोपांना ६ वेळा पाणी देणेसाठी ३.७ म.दि त्यात रु. ३८७.४० बैलगाडीभाडे गाडीवान व बैलजोडी यांचेवर खर्च रोहयो बाब क्र.२८ (शा.नि.दि.०९/११/२००९) व १ मजूर पाणी देणेसाठी असे एकूण रु. ५१४.४० प्र.म.दिन एप्रिल२ वेळा, मे २ वेळा व ऑक्टोबर १वेळा | ६.१६ | ३१६८.७० | ०.०० | ३१६८.७० |
| | एकूण | ४२.३८ | ७७६८.६४ | ४५.०० | ७८१३.६४ |
| | मजुर कल्याण खर्च २.७० % | | | | २१०.९७ |
| | आकस्मिक खर्च २ % | | | | १५६.२७ |
| | एकंदर एकूण | ४२.३८ | ७७६८.६४ | ४५.०० | ८१८०.८८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ड | **तृतीय वर्ष कामे** | | | | |
| १६ | १०० रोपांना निंदणी व माती सैल करुन आळे करणे (३ वेळा) आणि पाणी देण्यासाठी आळी करुन माती सैल करणे ३.४०म. दिन प्रति ५० खड्ड्यांसाठी व आवश्यकतेनुसार खते देणे | ६.८० | ८६३.३० | ४५.०० | ९०८.६० |
| १७ | संरक्षण व देखभाल व संगोपन - तृतीय वर्ष - एप्रिल ते मार्च | २९.४२ | ३७३६.३४ | ०.०० | ३७३६.३४ |
| १८ | गरजेनुसार १०० रोपांना प्रति रोप २० लिटर प्रमाणे २ वेळा पाणी देणे ( ५० रोपांना ६ वेळा पाणी देणेसाठी ३.७ म. दि. त्यात रु.३८७.४० बैलगाडीभाडे, गाडीवान व बैलजोडी यांचेवर खर्च रोहयो बाब क्र.२८ (शा.नि.दि. ०९/११/२००९) व १ मजूर पाणी देणेसाठी असे एकूण रु. ५१४.४० प्र.म.दिन एप्रिल १ वेळा, मे १ वेळा | २.४६ | १२६५.४२ | ०.०० | १२६५.४२ |
| | एकूण | ३८.६८ | ५८६५.३६ | ४५.०० | ५९१०.३६ |
| | मजुर कल्याण खर्च २.७० % | | | | १५९.५८ |
| | आकस्मिक खर्च २ % | | | | ११८.२१ |
| | एकंदर एकूण | ३८.६८ | ५८६५.३६ | ४५.०० | ६१८८.१५ |

**गोषवारा**

| अक्र | तपशील | म.दिन | मजुरी | साहित्य | इतर खर्च | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लागवड पूर्व कामे | १५.६८ | १९९१.३६ | ४.४८ | ९३.८० | २०८९.६४ |
| २ | प्रथम वर्ष कामे | ७४.२२ | ११३३९.७० | ७०४८.०० | ८६४.२२ | १९२५१.९२ |
| ३ | द्वितीय वर्ष कामे | ४२.३८ | ७७६८.६४ | ४५.०० | ३०३.३३ | ८११६.९७ |
| ४ | तृतीय वर्ष कामे | ३८.६८ | ५८६५.३६ | ४५.०० | २७७.७९ | ६१८८.१५ |
| | एकंदर एकूण | १७०.९६ | २६९६५.०६ | ७१४२.४८ | १५३९.१४ | ३५६४६.६८ |

प्रति रोप खर्च रु. ३५६/-